# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपुर

(घनकचरा व्यवस्थापन विभाग)

**<u>ई-निविदा</u>**

नागपुर महानगरपालिकेचे भांडेवाडी येथे "पशुनिवारा केंद्र" असुन आजारी-जख्मी, श्वानांना/इतर प्राण्यांना उपचारार्थ ठेवण्यात येते. पशुनिवारा केंद्रामधिल प्राण्यांना <u>भोजन व्यवस्था करण्यास इच्छुक महिला बचत गटा मार्फत करणे आहे.</u> करीता इच्छुक महिला बचत गट यांना सहभागी होण्याकरीता ई-निविदा प्रसिध्द करण्यात येत आहे.

**शर्ती व अटी** :–

1) सदरच्या कामाचा कालावधी एक वर्षा करीता असुन कार्यादेश दिल्याच्या दिनांकापसून लागू राहील. तसेच निविदाकारकाचे काम समाधान कारक असल्यास कार्यकाळ वाढविण्याची शिफारस विभागामार्फत करता येईल.

2) सदर ई-निविदा मध्ये नागपूर महानगरपालिकेच्या समाज कल्याण विभागाकडे नोंदणीकृत महीला बचत गट सहभागी होऊ शकेल.

3) ई-निविदा सोबत खालील कागदपत्रे सादर करणे राहील.

**अ) महिला बचत गटांची कागद पत्रे.**

(i) महीला बचत गटाचा ठरावाची प्रत.

(ii) महीला बचत गटाचे नोंदणी क्रमांक.

(iii) महीला बचत गटाचे नोंदणीकृत असल्याबाबत समाजकल्याण विभागाचे प्रमाणपत्र.

4) भांडेवाडी स्थित म.न.पा. चे पशुनिवारा केंद्रातील आजारी/जख्मी प्राण्यांना भोजनाची व्यवस्था करावी लागेल.

5) पशुनिवारा केंद्रातील आजारी/जख्मी प्राण्यांना दिवसातून दोन वेळेस भोजन देणे आवश्य्क राहील. भोजनाची वेळ सकाळी 10.00 ते 11.00 वाजता

दरम्यान आणि सायंकाळचे जेवण सायं. 6.00 ते 7.00 वाजता दरम्यान राहील.

6) सकाळच्या जेवणामध्ये प्रत्येक श्वानांकरीता 100 ग्रॅम गव्हाच्या दलीया/ पोळया दुधामध्ये मिसळवून पालेभाज्या इत्यादी राहील. तसेच सायंकाळच्या जेवणामध्ये 150 ग्रॅम तांदूळ, 50 ग्रॅम तूर दाळ, 100 ग्रॅम चिकन किंवा एक अंडा पालेभाज्या दोन चम्मच तेल इत्यादीच्या साहित्य / धान्य वापरून शिजवुन देण्यात येईल. या व्यतिरिक्त Multivitamin supplement देणे आवश्यक राहील.

7) प्राण्यांचे जेवन बनविण्याकरीता/ वाटपाकरीता आवश्यक साहित्य निविदाकारांना उपलब्ध करून घ्यावे लागेल. तसेच जेवन बणविण्याकरीता/ वाटपाकरीता वापरण्यात येणारी साहित्य स्वच्छ करण्याची/ धुण्याची जबाबदारी महीला बचत गट यांची राहील.

8) प्राण्यांकरीता जेवण तयार करणे व वाटप करणे याकरीता पुरेसे मनुष्यबळ नियुक्त करण्याची जबाबदारी निविदाकारांची राहील.

9) बाल कामगारांना कामावर घेण्यात येवू नये, तसेच Labour Employment Act, 1970 चे पालन करणे बंधनकारक राहील.

10) किमान वेतन कायदा ESI,P.F., etc तरतुदीचे पालन करणे निविदाकाराला बंधनकारक राहील.

11) सदर काम करतांना प्राण्यांना निर्दयतेने वागविण्यात/ हाताळण्यात येणार नाही याची खबरदारी निविदाकाराला घ्यावी लागेल. तसेच प्राणी क्रुरता कायदा, 1960 मधील तरतुदींचे पालन करणे बंधनकारक आहे.

12) सदरचे कामे करतांना निविदाकाराच्या कर्मचाऱ्यांना किंवा त्यांचे सहकारी यांना ईजा/ दुखापत झाल्यास त्याची संपूर्ण निविदाकाराची राहील.

13) सदर कामाबाबत प्राणी प्रेमी संघटना किंवा प्राणी मित्रांव्दारे तक्रार / आक्षेप घेतल्यास त्याचे निराकरण करण्याची जबाबदारी निविदाकाराची राहील.

14) म.न.पा. पशुनिवारा केंद्रातील आजारी / जख्मी प्राण्यांना भोजन व्यवस्था करते वेळी त्यांचा कामाचा अहवाल दर महिण्याला कार्यालयाला सादर करणे बंधन कारक राहिल. केलेल्या कामाचे देयके महिण्याच्या 5 तारखेपर्यंत सादर करावी.

15) महानगरपालिकेचे कोणतेही अधिकारी, पदाधिकारी परीक्षण / तपासणी करतील, त्यांना उचित सहकार्य करावे लागेल.

16) कार्यक्रम राबवितांना महानगरपालिकेची मालमत्ता / साहीत्यांचे नुकसान / चोरी झाल्यास ती सात दिवसांचे आत पूर्ववत्त भरून काढण्याची जबाबदारी निविदाकारांची राहील. तसे न झाल्यास नुकसान भरपाईची रक्कम, मासीक देयकामधून वसूल करण्यात येईल.

17) दोन्ही पार्टी मध्ये काही वाद उदभवल्यास त्याकरीता केवळ नागपूर शहर हद्दीतील मा. न्यायालय हे न्यायाधिकरीता क्षेत्र राहील.

18) म.न.पा. भांडेवाडी पशुनिवारा केंद्रातील प्राण्यांना भोजन व्यवस्था करण्याच्या कामासाठी केवळ वापर करण्याचा अधिकार निविदाकाराला देण्यात येत आहे. ह्या व्यतीरिक्त दुसऱ्या कोणत्याही कामाकरीता मनाई राहील.

19) भांडेवाडी पशुनिवारा केंद्राचे आधुनिकीकरण करण्यासाठी देणगी बाबत सरकारी / निमसरकारी / खाजगी संस्थेला आवेदन करायचे झाल्यास मनपाची पूर्व परवानगी घेणे बंधनकारक राहील व मिळालेल्या देणगीचा वापर मनपा मार्फत करण्यात येईल.

20) म.न.पा. भांडेवाडी पशुनिवारा केंद्राच्या जागेवर भविष्यामध्ये मालकी हक्क दाखविता येणार नाही मालकी हक्काकरीता कुठल्याही प्रकारचा दबाव निविदाकाराला आणता येणार नाही.

21) मनपाच्या कुठल्याही जागेवर कर्ज बॅंके कडून / संस्थेकडून / व्यक्तीकडून घेता येणार नाही.

22) सबब निविदाकाराने मनपाच्या अटी व शर्तीचे उल्लंघन केल्यास मनपा सदरचा करार बिना इतल्ला रद्द करू शकेल व त्याकरीता निविदाकाराला उजर करण्याचा कोणताही हक्क असणार नाही.

उपायुक्त तथा संचालक,
घनकचरा व्यवस्थापन विभाग
महानगरपालिका, नागपूर

निविदाकाराची स्वाक्षरी

# नागपूर महानगरपालिका, नागपुर

घनकचरा व्यवस्थापन विभाग

**ई-निविदा सुचना**

नागपुर महानगरपालिकेचे भांडेवाडी येथे "पशुनिवारा केंद्र" असुन आजारी-जख्मी, श्वानांना/इतर प्राण्यांना उपचारार्थ ठेवण्यात येते. पशुनिवारा केंद्रामधिल प्राण्यांना भोजन व्यवस्था करण्यास इच्छुक महिला बचत गटा मार्फत करणे आहे. करीता इच्छुक महिला बचत गट यांना सहभागी होण्याकरीता ई-निविदा प्रसिध्द करण्यात येत आहे.

विभागाचे नांव : घनकचरा व्यवस्थापन विभाग

उपविभाग : पशुवैद्यकिय सेवा कक्ष

विभाग प्रमुखांचे नांव : उपायुक्त तथा संचालक,म.न.पा.,नागपुर.

| Sr.No. | Name of Work | Estimated Cost in Rs Annual | E-tender Sale Date | E-tender Subsission Date (upto 3.00 pm.) | Opening of E-tender Date & Time (4.00pm) | Cost of Balnk Tender |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | | | | | | |
| | नागपूर महानगरपालिकेचे भांडेवाडी स्थित पशुनिवारा केंद्रातील प्राण्यांकरीता भोजन व्यवस्था करण्यासंदर्भात ई - निविदा | 11,23,200/- | 17/03/2025 | 25/03/2025 | 26/03/2025 | Rs. 590/- |

"पशुनिवारा केंद्रातील" प्राण्यांकरीता भोजन व्यवस्थेकरीता ई-निविदा.

उपायुक्त तथा संचालक
घनकचरा व्यवस्थापन विभाग,

महानगरपालिका, नागपुर.

# नागपूर महानगरपालिका, नागपुर

घनकचरा व्यवस्थापन विभाग

**ई-निविदा सुचना**

नागपूर महानगरपालिकेचे भांडेवाडी येथिल पशुनिवारा केंद्रातील प्राण्यांकरीता जेवण व्यवस्था करण्यासंदर्भात इच्छुक महिला बचत गटा मार्फत करण्याकरिता ई-निविदा.

**ई-निविदा दरपत्रक**

| **विवरण** | **दर** |
|---|---|
| नागपुर महानगरपालिकेचे भांडेवाडी स्थित पशुनिवारा केंद्रामधील प्राण्यांकरीता प्रति प्राणी प्रति दिवस प्रमाणे दर (सर्व प्रकारच्या करांचा समावेश करून) | प्रति प्राणी प्रति दिवस प्रमाणे दर रूपये :<br>रू. ..........................................................................<br>(अक्षरी रू. ...............................................................<br>...............................................................................) |

(दर पत्रकामध्ये नमुद दर प्रति दिवस प्रति श्वान प्रमाणे राहतील. दिवसातुन दोन वेळेस जेवण देणे बंधनकारक राहील. तसेच एका वेळेच्या जेवणाचा खर्च नमुद दराच्या अर्धा करून धरण्यात येईल.)

**निविदाकाराची स्वाक्षरी**